साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 34 वे

| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे

संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.११ | पाने-१२ | दि.२२/३/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.




# माढा लोकसभा मतदारसंघात करमाळा चर्चेत

## माजी आमदार नारायण पाटील यांना दोन्ही बाजुकडून निमंत्रण

करमाळा : माढा लोकसभा मतदारसंघात करमाळा तालुका सध्या जोरदार चर्चेत आहे. करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांना उमेदवारीसाठी दोन्ही बाजुकडून निमंत्रण असल्याने सध्यातरी अनेकांच्या नजरा करमाळ्याकडे लागलेल्या आहेत.

माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांचा मतदारसंघ म्हणून माढा लोकसभा मतदारसंघाची ओळख आहे. त्यामुळे प्रसिध्दीच्या झोतात असलेल्या मतदार संघातून यावेळी प्रथमच करमाळा तालुक्यातील स्थानिक माजी आमदार नारायण पाटील यांच्या उमेदवारीसाठी भाजपातील एक गट प्रयत्नशील आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातून थेट उमेदवारीचे निमंत्रण दस्तुरखुद्द जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांनी जेऊर येथे येऊन दिले आहे. त्यामुळे माढा लोकसभा मतदार संघात करमाळ्याचे नाव चर्चेत आले आहे.



माढा मतदारसंघातून भाजपाच्या वतीने विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना पुन्हा एकदा उमेदवारी दिली आहे. नाईक-निंबाळकर यांना उमेदवारी दिल्याने माळशिरस तालुक्यातील मोहिते-पाटील घराणे नाराज झाले आहे. त्याचबरोबर फलटण तालुक्यातील रामराजे नाईक-निंबाळकर यांचाही गट नाराज झालेला आहे. दोन तालुक्यातील दिग्गज प्रतिनिधींच्या नाराजीमुळे करमाळा तालुक्यातील माजी आमदार नारायण पाटील यांना उमेदवारी देऊन हा वाद मिटवण्याच्या दृष्टीने भाजपाचा वरीष्ठ पातळीवरून प्रयत्न चालू आहे. एका बाजुला भाजपाच्या माध्यमातून पाटील यांचे नाव चर्चेला घेत असताना दुसऱ्या बाजुला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या मार्फतही नारायण पाटील यांना उमेदवारी द्यावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी पक्षाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांनी स्वत: जेऊर येथे येऊन पाटील यांना उमेदवारी बाबत विचारणा केलेली आहे. (पान ३ )



राजकारणाचा खेळ हा उघड्या डोळ्याने पाहता येत नाही तो मुक्या मनाने समजून घ्यायचा असतो....!

## संपादकीय.......................................!

# चिक्कू..

जवळ पैसा असूनही खर्च करण्याची इच्छा नाही, अशी व्यक्ती म्हणजे चिक्कू. यालाच कंजुष,कद्रुप, कवडीचुंबक, कृपण, चिकट असेही म्हणतात. चिक्कू माणसांच्या संदर्भात काही विनोद सांगितले जातात. एक चिकट माणूस एकदा रात्री आपल्या मुलीला भेटण्यासाठी चालत निघाला होता. रात्री जाण्याचे कारण म्हणजे दिवसा चालत गेलोतर लोक नावे ठेवतील म्हणून रात्री निघाला. तो साधारणत: दोन किलोमीटर चालत गेला असेल त्यावेळी त्याला अचानक आठवण झाली की.. 'घरातील दिवा आपण विझवला नाही.' तो परत माघारी गेला आणि दरवाजातून त्याने बायकोला आवाज दिला. 'कडी काढू नको ती झिजेल. तु दिवा विझवला का ?' तेव्हा बायको म्हणाली.. 'तुम्ही गेला तेव्हाच दिवा विझवला, पण तुमची चप्पल डबल झिजली.' तो म्हणतो.. 'मी जिथ पर्यंत गेलो होतो तिथून चप्पल हातात आणली आहे व जातानाही तिथपर्यंत चप्पल घालणार नाही !' अशाप्रकारे चिक्कू लोकांच्या कथा आहेत.

अशाच प्रकारातील एक चिकट महाकेसरी स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत अनेकजण बाहेर पडले, पण तिघंजण शेवटी राहिले. त्या प्रत्येकांना एक-एक सुपारी देण्यात आली. जो या सुपारीचा जास्तीत जास्त दिवस वापर करेल तो चिकट केसरी असे ठरले. विशेष म्हणजे सुपारीचा दररोज वापर केला पाहिजे. त्यानुसार पहिल्याने सुपारीचे कागदासारखे अडकित्त्याने तुकडे केले व दररोज थोडा थोडा तुकडा खात असे. दुसऱ्याने सुपारी जात्यामध्ये दळली व त्याचे पीठ एका डबीत भरले. दररोज त्या डबीतील पावडर तो चाटत असे. तिसऱ्याने सुपारीमध्ये एक खीळा ठोकला आणि त्यास एक धोरा बांधला. दोरा हातात धरून जेवण झालं की तो ती सुपारी तोंडात टाकत असे आणि बाहेर काढत असे. अर्थातच तिसऱ्या क्रमांकाची सुपारी पहिल्या दोघांची सुपारी संपल्यानंतरही अगदी व्यवस्थित राहिली. त्यामुळे त्याला चिकट केसरी पुरस्कार देण्यात आला.

थोडक्यात आयुष्यामध्ये अनेकजण चिकटपणा करतात आणि मन मारून किंवा इच्छा असूनही आपल्या गरजेच्या वस्तू घेत नाहीत. अशी व्यक्तीच चिक्कू असते. परंतु आज आपण याच चिक्कूचा विचार न करता चिक्कू म्हणजे खाण्याचे फळ. थोडक्यात चीकूचा विचार करणार आहोत.

चीकू हे खाण्याचे फळ असून ते तसे परदेशी फळ आहे. हे फळझाड मुळचे मेक्सीको मधील आहे. परंतु आता भारतात देखील चीकूचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाते. चीकूच्या कलकत्ता मोठी, काळीपत्री, छत्री, द्वारापुडी अशा चार ते पाच जाती आढळतात. चीकूचे खोड काळपट रंगाचे असते तर झाडाचे पान हिरवीगार असतात. पानाचा आकार लांबट असतो, त्याला देठ असतो. चीकूचे फळ हे चॉकलेटी असते. फळ गोलाकार व अंडाकृती असते. आतील गर तांबूस व तपकीरी रंगाचा असतो व चवीला गोड असतो. फळामध्ये काळ्या रंगाचे बी असते. विशेष म्हणजे हे झाड बारमाही फळ देते.

चीकू पीकाच्या लागवडीसाठी मध्यम प्रतीची व उत्तम निचरा होणारी बागायती जमीन आवश्यक असते. दमट आणि कोरड्या हवामानात चीकूची वाढ चांगली होते. एप्रिल ते मे महिन्यात लागवडीसाठी १० बाय १० मीटर अंतरावर १ बाय १ बाय १ मीटर आकाराचे खड्डे खांदून त्यात मिथीलपॅराथीऑन हे टाकवे. त्यात शेणखत व सुपर फॉस्फेट टाकले जावे. रोपांची लागवड जुलै ते ऑगस्ट महिन्यात केली जावी. कलमाची वाढ होण्यास आठ वर्षाचा कालावधी लागतो. चीकूचे झाडाचे आयुष्य शंभर वर्षपेक्षा जास्त आहे. साधारणत: १० ते १५ वर्षाच्या चीकूच्या एका झाडास जवळपास १ टन चीकू मिळतात. चीकू गाभुळा झाल्यानंतर फोडला जातो. त्यानंतर तीन दिवसात खाण्यासाठी किंवा विक्रीसाठी उपलब्ध होतो. चीकूचे आयुष्य फार कमी आहे त्यामुळे चीकूला स्थानिक मार्केटच पहावे लागते. चीकूची पावडर करता येते. ती पावडर पासून मिल्कशेक तयार केला जातो. तसेच मिठाई व आईस्क्रीम मध्ये त्याचा वापर केला जातो. चीकूचा जॅम केला जातो. चीकूपासून ज्युस बनवला जातो. चीकूचे लोणचेही बनवले जाते. चीकू हे परदेशी पीक असलेतरी महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील बोर्डी आणि घोलवड ही किनारी गावे भारतातील चीकू लागवडीचे केंद्र आहेत. चीकूपासून सर्वात प्रथम वायनरी बनवली आहे. चीकूच्या बाबतीत एक तोटा सांगितला जातो तो म्हणजे चीकूच्या फळाचे जास्त सेवण केल्याने पोटदुखी होवू शकते. कारण त्यात फायबर आणि टॅनीनचे प्रमाण जास्त आहे. चीकूसाठी पाणीही कमी लागते आणि एकरी दीड ते दोन लाखाचे उत्पन्न सहज मिळते.

चीकू खाल्ल्याने प्रतिकारशक्ती वाढते. तापाने तोंडाची चव गेल्यास चीकू खाल्ल्यास चव येते. तसेच चीकूच्या सालीचा काढा अतिसार व ताप यामध्ये दिल्यास जुलाब व ताप कमी होतो. चीकू खाल्ल्याने पचनशक्ती मजबुत होते. चीकूमध्ये व्हिटॅमीन सी असते, कफ बाहेर पडतो. हिवाळ्यात चीकू खाल्ल्यास सर्दी बरी होते. चीकूमध्ये टॅनीनचे प्रमाण अधिक असते त्यामुळे पोटाच्या समस्या चीकूमुळे सुटतात. चीकूमध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असते, त्याचा औषध म्हणून वापर होतो. त्वचा हेल्दी राहते. चीकूचे नेहमी सेवन केल्यास बध्दकोष्ठता दूर होतो. पीत्तकारक डोकेदुखी, ताप, लघवीचा त्रास यावर हे फळ महत्वाचे आहे.

## 'आदिनाथ' वर नवे प्रशासकीय मंडळ
### घुमरे, डॉ.पुंडे, देशमुख यांचा समावेश





करमाळा(सं.प्र.) : श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्यावर पहिल्या प्रशासकीय संचालक मंडळाची मुदत संपल्याने आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन प्रशासकीय संचालक मंडळ नेमण्यात आले आहे. या प्रशासकीय मंडळात विलासराव घुमरे, डॉ.वसंतराव पुंडे व ॲड.दिपक देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आ.मोहिते-पाटील यांनी मागील महिन्यात आदिनाथ कारखाना वाचला पाहिजे व पुन्हा एकदा सहकारी तत्वावर चालला पाहिजे. यासाठी अकलुजला सर्व गटांची बैठक बोलावली होती. या बैठकीला माजी आमदार जयवंतराव जगताप, नारायण पाटील, विलासराव घुमरे यांच्यासह प्रमुख नेतेमंडळी उपस्थित होती. या बैठकीत सर्व नेत्यांनी सकारात्मक विचार व्यक्त करून आ.मोहिते-पाटील यांनी आदिनाथसाठी पुढाकार घ्यावा; असे सांगितले. साधारणपणे २५० कोटी रूपये कर्ज असणारा आदिनाथ वाचवण्यासाठी मोहिते-पाटील प्रयत्न करत आहेत. पहिल्या प्रशासकीय संचालक मंडळाची मुदत संपली होती. त्यांना नव्याने मुदतवाढ देण्यात आली नाही. त्यामुळे हे नवीन प्रशासकीय संचालक मंडळ नेमण्यात आले आहे.

## पुरातन बारवेच्या पाण्याचा बेकायदेशीर उपसा नगरपालिकेने कारवाई करण्याची मागणी

करमाळा(सं.प्र.) : कुंभारवाडा लगत असलेल्या पुरातन बारवेच्या पाण्याचा बेकायदेशीर उपसा होत असून, याकडे दुर्लक्ष केले तर भविष्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागेल. त्यामुळे वेळीच नगरपालिकेने काळजीपूर्वक याकडे लक्ष देवून संबंधितांवर कारवाई करावी; अशी मागणी या भागातील नागरीकांनी केली आहे. कुंभारवाड्याकडे जाताना ओढ्याच्या अलिकडे पुरातन काळातील बारव आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी या बारवेची संपूर्ण स्वच्छता केली आहे. दुपारचे वेळेस लहान मुले पोहण्याचाही आनंद घेतात. पण अलिकडे काही अज्ञात मंडळी या बारवेतील पाण्याचा उपसा करत असल्याचे लक्षात आले आहे. यामुळे या भागातील अनेक बोअरचे पाणी कमी होत आले आहे. भविष्यात असाच बेकायदेशीर उपसा चालू राहिल्यास बारवेचे पाणी कमी होऊन आसपासच्या बोअरचेही पाणी कमी होणार आहे. त्यामुळे बेकायदेशीर पाणी उपसावर बंदी घालावी; अशीही मागणी या भागातील नागरीकांनी केली आहे.

## छत्रपती शिवाजी चौक ते श्रीदेवीचामाळ रस्त्यावर डिवायडर करून सुशोभिकरण करावे : नागरीकांची मागणी

करमाळा(सं.प्र.) : छत्रपती शिवाजी चौक ते श्रीदेवीचामाळ या दरम्यानच्या रस्त्यावर वाहतूक वाढली असून, तासन्तास वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यामुळे नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच या रस्त्यावरील असलेले स्पीडब्रेकर संपुष्टात आल्याने वाहने सुसाट वेगाने जा-ये करत आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या रस्त्यावर डिवायडर करून सुशोभिकरण करण्यात यावे; अशी मागणी नागरीकातून होत आहे.

श्रीदेवीचामाळ रोडवरील चिवटे दुकानापासून ते श्रीदेवीचामाळ पर्यंत चांगला रस्ता झाला आहे. या रस्त्यावर वाहतूक वाढल्यामुळे ट्राफीक जाम होत आहे. तसेच या परिसरात शाळा, बँका, दवाखाने, पेट्रोलपंप व अन्य शेतीविषयक दुकाने, कापड दुकान असल्यामुळे हा परिसर सतत गजबजलेला आहे. या रोडवर डिवायडर नसल्यामुळे वाहने जोरात येतात. डिवायडर नसल्यामुळे वाहनांना ज्या दिशेला जायचे आहे त्या दिशेला वळता येत नाही. कोणी कसेही वाकडे-तिकडे वाहने चालवतात. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. तसेच या रस्त्यावर श्रीदेवीचामाळच्या पायथ्याला मंदिराजवळ अरूंद रस्ता झालेला आहे. पांडे गावाकडून आलेली वाहने सरळ मंदिराच्या दिशेनेच येतात. त्यामुळे या ठिकाणी रस्ता अरूंद असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या ठिकाणीही गतिरोधक बसवून रस्ता मोठा करावा. कमलादेवीच्या मंदिराकडे जाणारा हा एकमेव असल्याने या रस्त्याला डिवायडर करून त्यामध्ये चांगल्या प्रकारची झाडे लावून सुशोभिकरण करण्यात यावे. तसेच भाविकांना जाणे- येण्यासाठी रस्त्याच्या दोन्हीबाजून पादचारी रस्ता बनविण्यात यावा; अशी मागणी नागरीकातून येत आहे. डॉ.व्होटकर दवाखाना ते चिवटे दुकान मधील रस्ता काही कारणामुळे झालेला नाही. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने तोडगा काढून हा रस्ता पूर्ण करावा. या रस्त्यावर असलेले अतिक्रमण काढण्याची मागणी शहरवासियातून होत आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून पुढे...

# माढा लोकसभा मतदारसंघात करमाळा चर्चेत

अशा स्थितीमध्ये करमाळा तालुका सध्या पाटील यांच्या माध्यमातून जोरदार चर्चेला जात आहे.

माढा मतदारसंघातून माजी आमदार नारायण पाटील यांना उमेदवारी दिल्यास मोहिते-पाटील यांची नाराजी दूर होऊ शकते. याचबरोबर रामराजे नाईकनिंबाळकर या गटाची सुध्दा नाराजी दूर होऊ शकते. त्याचबरोबर या मतदारसंघामध्ये धनगर समाजाची मोठी शक्ती आहे. ही शक्ती पाटील यांच्या रूपाने पक्षाला मिळणार आहे. त्यामुळे दोन्हीकडून पाटील यांना उमेदवारी देण्याबाबत जोरदार खलबते सुरू आहेत.

सध्या दोन्ही गटातून पाटील यांना उमेदवारीची विचारणा होत असल्याने करमाळा तालुक्यातील पाटील समर्थकांच्या दृष्टीने ही एक आनंदाची बाब आहे. जर पाटील यांना उमेदवारी मिळाली तर संपूर्ण लोकसभा मतदारसंघातून पाटील हे सहजरित्या विजय होऊ शकतात; असे अनेकांच्या अंदाजातून स्पष्ट होत आहे. अशा स्थितीत स्थानिक उमेदवार म्हणून पाटील यांना उमेदवारी दिलीतर करमाळा मतदारसंघाचा एक दबदबा निर्माण होणार असल्याने तालुक्यातील जनता या ठिकाणी समाधानी असल्याचे चित्र दिसून येत आहे.

> माजी आमदार नारायण पाटील यांना माढा मतदारसंघातून उमेदवारी देण्याबाबत दोन्ही पक्षाकडून होत असलेली चर्चा पाहून पाटील यांचे राजकीय क्षेत्रात किती वजन आहे हे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे पाटील विरोधकांना या निमित्ताने त्यांची वरीष्ठ पातळीवर काय किंमत आहे हे दिसून आले आहे. यामुळे पुन्हा एकदा पाटील गट निश्चित प्रकारे पूर्ण क्षमतेने कामाला लागलेला दिसत आहे. लोकसभा निवडणुकीला उमेदवारी मिळाली तर जोरदार काम करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला आहे. आणि लोकसभेची उमेदवारी मिळाली नाहीतरी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने आजची चर्चा पाटील गटाच्या दृष्टीने निश्चितच महत्वाची आहे. नारायण पाटील समर्थकांनी नुकतीच बैठक घेऊन क्रियाशील राहण्याचा निर्धार केला आहे.

# सिध्दार्थ व्यायाम शाळेच्या बांधकामास ३० लाख निधी

करमाळा(सं.प्र.): गेली ३० वर्षापासून सिध्दार्थ व्यायाम शाळेचा प्रश्न प्रलंबित होता. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी या व्यायामशाळेच्या बांधकामास ३० लाख रूपये मंजूर करून दिले. आज या कामाची सुरूवात झाली. खऱ्या अर्थाने या कृतीतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची संवेदनशीलता दिसून आली; असे मत रिपाइंचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष नागेश कांबळे यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून सिध्दार्थ व्यायामशाळेच्या नूतनीकरणाच्या कामास ३० लाख रूपये निधी मिळाला व या कामास सुरूवात झाली त्यावेळी कांबळे बोलत होते. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील, तालुका प्रमुख देवानंद बागल, करमाळा विधानसभा अध्यक्ष राहुल कानगुडे, शहरप्रमुख संजय शिलवंत, युवा सेना जिल्हा समन्वयक निखिल चांदगुडे, तालुकाप्रमुख नवनाथ गुंड, जेऊर शहरप्रमुख बाळासाहेब कर्चे, महिला आघाडी जिल्हा उपाध्यक्ष ज्योतीताई शिंदे, महिला शहरप्रमुख किर्ती स्वामी, रंभापुरा शाखाप्रमुख निलेश चव्हाण, सोशल मिडीया प्रमुख जयराज चिवटे, दलित सेनेचे लक्ष्मण भोसले, रिपाइंचे दादा कांबळे, वंचित आघाडीचे दादासाहेब लोंढे, संजय कांबळे, प्रफुल्ल दामोदरे, कॉन्ट्रॅक्टर किशोर भगत उपस्थित होते. यावेळी दादा लोंढे यांनी सिध्दार्थ व्यायाम शेजारीच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका इमारत उभा करावी; अशी मागणी केली.

# भाजपा युवा मोर्चाच्या शहर उपाध्यक्ष पदी फैजाना शेख

करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या करमाळा शहर उपाध्यक्ष पदी फैजान अल्लाउद्दीन शेख यांची निवड करण्यात आली आहे. भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप यांच्या उपस्थितीत शेख यांची निवड झाली. फैजान शेख हे रईस इलेक्ट्रॉनिक्सचे मालक उद्योजक अल्लाउद्दीन शेख यांचे सुपुत्र आहेत. फैजानला लहानपणापासून समाजसेवेची आवड व भाजपामध्ये काम करण्याची विशेष आवड होती. त्यांची काम करण्याची क्षमता आवड बघून त्यांना शहर उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळाली आहे. निवडीनंतर फैजान शेख म्हणाले, की मिळालेल्या पदाला न्याय देऊन भाजपाचे काम घराघरापर्यंत पोहचविणार असून, दिलेल्या संधीचे सोने करणार असल्याचे सांगितले.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# नव्याने नियुक्त नोटरींचा करमाळा वकील संघाकडून सन्मान



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यात नव्याने भारत सरकारकडून नेमण्यात आलेल्या नोटरींचा सत्कार करमाळा वकील संघाच्या वतीने करण्यात आला. यावेळी वकील संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते. तालुक्यातील ॲड.रविंद्र बरडे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड.दत्तात्रय सोनवणे, ॲड.अलीम पठाण, ॲड.योगेश शिंपी, ॲड.एम.डी.कांबळे, ॲड.नवनाथ राखुंडे, ॲड.अनिल कांबळे, ॲड.प्रविण देवकर, ॲड.अजित विघ्ने, ॲड.सौ.मांगले-शिंगाडे यांची केंद्र शासनाच्या नोटरी पदी निवड करण्यात आली आहे. वकील संघाच्या वतीने या सर्वांचा एकत्रित सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड.बाबूराव हिरडे, ॲड.सविता शिंदे, ॲड.राहुल सावंत, ॲड.बलवंत राऊत यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव ॲड.विनोद चौधरी यांनी केले तर उपस्थितांचे आभार ॲड.सुहास मोरे यांनी मानले.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
थंडा.. थंडा.. कुल.. कुल..
विविध प्रकारामध्ये 'फ्रेश व बेस्ट क्वॉलिटी'चे
उन्हाळी पदार्थ
गुलकंद । सब्जा बी । फुलराणी खडीसाखर । रोझवॉटर । गुलाब पाकळी । आईस्क्रीम पावडर
फालुदा । ताक मसाला । जलजिरा पावडर । लेमन गोळी । कोकम सरबत । कोकम आगळ
कैरी पन्हे । आवळा सरबत । रसना । ग्लुकोंडी । आमपन्ना पावडर । लिंबूपानी सरबत पावडर
कोकनट वॉटर पावडर । आवळा कॅन्डी । मधातील आवळा कॅन्डी । मोर आवळा । रूहाब्जा
मॅप्रो सरबत/क्रश सर्व फ्लेवर (रोझ, मँगो, पायनापल, ऑरेंज, स्ट्रॉबेरी, खस, कोकम)
लेमन गोळी व इतर फ्लेवर गोळ्या : लेमन गोळी । ऑरेंज संत्री गोळी । पेपर मिंट गोळी
पोलो गोळी । मँगो गोळी । कच्ची कैरी गोळी। पेरू गोळी । पान गोळी । काला खट्टा गोळी
चिंच गोळी । मिक्स फ्रूट गोळी । कोको बटर गोळी (जुनी रावळगाव गोळी)
नाचणीचे पदार्थ..
• नाचणी
• नाचणी पीठ
• नाचणीचे पापड
• नाचणी बॉबी
• नाचणी डिस्को पापड
• नाचणी बिस्किट

| वस्तू | एमआरपी | डि.ऑफर |
|---|---|---|
| मॅप्रो क्रश/सरबत | रू.१८० | रू.१४४ |
| टाटा गोल्ड चहा १ कि. | रू.४७५ | रू.३९९ |
| प्लास्टीक पाणी बॉटल (अनब्रेकेबल) | रू.११५ | रू.४९ |

सदर कात्रण घेऊन येणाऱ्या ग्राहकांसाठी ऑफर्स *
ऑफर कालावधी : १५ ते ३१ मार्च २०२४
पापड, सांडगे व लोणचेसाठी
• मुगदाळ • उडीददाळ • मटकीदाळ • पापड मसाला • पापड आटा • पापड खार • मोहरीदाळ
• लोणचे मसाला • मेथी • कारळं
सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या छापील किंमतीवर कमीत कमी 10% डिस्काउंट
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू.
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् ।
। नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

# सांस्कृतिक महोत्सवातील क्रिडा स्पर्धेत नामसाधना शाळेचे सुयश



करमाळा(सं.प्र.) : नगरपालिका शिक्षण मंडळ आयोजित आंतरशालेय क्रिडा व सांस्कृतिक महोत्सव डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशालेत अतिशय उत्साहात संपन्न झाला. या महोत्सव दरम्यान झालेल्या क्रिडा स्पर्धेत नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर सेंट्रल स्कुल मुले नं.१ शाळेने मुले विभागातून वैयक्तीक क्रिडा प्रकारातील १५ पैकी १० बक्षीसे पटकावली. सांघिक क्रिडा प्रकारात कबड्डीचे विजेतपद पटकावले. तीन पायाची शर्यतीमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच क्रिडा संचलनामध्ये आर्मीच्या वेशामध्ये छोट्या बालवीरांनी शिस्तबध्द पध्दतीने संचलन करून त्यातही द्वितीय क्रमांक मिळवून प्रेक्षकांची मने जिंकली. लिंबू चमचा स्पर्धेत लहान गटात शिवांश लावंड (प्रथम), शर्विल मस्कर (द्वितीय), शौर्य राखुंडे (तृतीय) व ५० मीटर धावणे मध्ये स्वानंद काळदाते (द्वितीय) यांनी यश संपादन केले. मोठ्या गटातून लिंबु चमचा स्पर्धेत जय थाटे (द्वितीय), यशराज पाटील (तृतीय)., १०० मीटर धावणे मध्ये प्रतिक शेरे (प्रथम), यशवर्धन देशमुख (द्वितीय)., तीन पायाची शर्यतीत सौरभ बागल, तन्मय कलाल यांनी यश संपादन केले. शिक्षकांच्या संगीत खुर्ची मध्ये सुरेखा कांबळे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला.

त्याचबरोबर १६ मार्च रोजी पार पडलेल्या समुह नृत्य स्पर्धेत याच शाळेने लहान गटात प्रथम क्रमांक पटकावून दमदार कामगिरी केली आहे. तसेच मोठ्या गटातही द्वितीय क्रमांक पटकावला आहे. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका सुनंदा जाधव, शिक्षक सुरेश कोळी, लालासाहेब शेरे, सुनिता शितोळे, सुनिता भैलुमे, धनश्री उपळेकर, मंगल गलांडे, सुषमा केवडकर, आशा अभंगराव, वैशाली जगताप, सुरेखा कांबळे, अश्विनी ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेने मिळविलेल्या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# राज्यस्तरीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेत प्रतिक होनकळसे याचे सुयश



करमाळा(सं.प्र.) : राज्यस्तरीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षा २०२३-२३ या परीक्षेत करमाळा शहरातील संगोबा रस्त्यावरील डी.जी.पाटील शाळेतील तिसरीत शिकणाऱ्या प्रतिक महेश होनकळसे याने ३०० पैकी २८४ गुण मिळवून सुयश संपादन केले आहे. या यशाबद्दल प्रतिक याचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे. या परीक्षेसाठी प्रतिक यास शिक्षिका राधिका महेश होनकळसे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रतिक याचे अभिनंदन शाळा व्यवस्थापक किरण शेंदरकर, मुख्याध्यापक शिवाजी गायकवाड व सर्व शिक्षकवृंद यांनी केले.




NOTARY GOVERNMENT OF INDIA ADVOCATE

आमचे मंडळाचे सदस्य
व आधारस्तंभ
ॲड.जगदीश सुरेश फलके
यांची भारत सरकार **नोटरी** पदी निवड झाल्याबद्दल
**हार्दिक अभिनंदन !**
शुभेच्छुक
**सहकार युवक मित्र मंडळ**
तेलीगल्ली, करमाळा.



डॉ.राऊत
Advanced dental Clinic & Root Canal Center
**दातांचा दवाखाना**
Smile with confidence

उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे



डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

**महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)**


# इरा पब्लिक स्कुल मध्ये विद्यार्थ्यांसाठी 'प्रेरणा व पालकांची जबाबदारी' विषयावर व्याख्यान



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण नं.१ येथील इरा पब्लिक स्कुल मध्ये विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा व पालकांची जबाबदारी या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून युवा व्याख्याते प्रा.विशाल गरड, कार्यक्रमाचे अध्यक्ष इरा पब्लिक स्कुलचे अध्यक्ष डॉ.ब्रिजेश बारकुंड, संस्थेचे सचिव सुनील अवसरे, उपाध्यक्ष हरिश्चंद्र बारकुंड, मुख्याध्यापक आनंद कसबे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य दादा पोरे, वैभव बोराडे, विकास गव्हाणे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रा.गरड यांनी पालकांच्या जबाबदाऱ्या, विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रासंबंधी असलेली रूची व आवड, शिक्षकांची जबाबदारी व कर्तव्य अशा चौफेर प्रेरणादायी विचारांनी संपूर्ण वातावरण फुलून टाकले. या व्याखानमालेबरोबरच महिला दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व पालकांसाठी भव्य अशा लकी ड्रॉचे देखील आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण दहा लकी पालकांना शाळे मार्फत विविध भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर प्रशालेतील नर्सरी ते आठवी पर्यंतचे जे विद्यार्थी संपूर्ण वर्षभरात एकही दिवस गैरहजर राहि नाहीत; अशा तब्बल दहा विद्यार्थ्यांचा सन्मान पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रशालेतील तिसरी ते आठवी पर्यंतच्या बालवैज्ञानिकांचे शालेय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन सहशिक्षक सुहास ढेंबरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक आनंद कसबे यांनी मानले.


डॉ.नायकुडे यांचे **डोळ्यांचा दवाखाना** **श्रीजय नेत्र रूग्णालय**
**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
**वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध**
**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
**श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३**

# महिलांचे आरोग्यविषयक उपक्रम हाती घ्यावेत : डॉ.सायली पाटील




करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी योग्य मार्गदर्शनाची गरज असून नारायण आबा पाटील मित्र मंडळाने यासाठी पुढाकार घेऊन महिलांचे आरोग्य-विषयक उपक्रम हाती घ्यावेत; असे आवाहन डॉ.सायली पाटील यांनी केले.

जेऊर येथे महिला दिनानिमित्त आयोजित महिला महोत्सवाच्या समारोप प्रसंगी डॉ.पाटील बोलत होत्या.

नारायण पाटील मित्र मंडळ व ग्रामपंचायत जेऊर यांचे वतीने महिला महोत्सव आयोजित केला होता. यात पाककला, रांगोळी, वक्तृत्व, अभिनय, वेशभुषा, डान्स, अंताक्षरी, फनी गेम्स आदी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्योतीताई पाटील या होत्या. व्यासपीठावर अनिता जगताप, जयश्री, रत्नमाला बादल, उषा सरक, विजया भोसले, सुनिता पाटील, प्रेमलता दोशी, सुचिता राठोड, अनिता दोशी, नंदा गादीया, नंदा तळे, विजया कर्णवर, रोहिणी सुतार, सुलभा घाडगे, जनाबाई कांबळे, भारती बलदोटा, ताहिरा शेख, राजश्री दोशी, वैशाली दोशी, वैशाली कोठारी आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.पाटील म्हणाल्या, की तालुक्यातील नागरीकांचे विशेष करून महिला भगिणींचे आरोग्यमान उंचावण्यासाठी त्यांना आरोग्य-विषयक माहिती उपक्रमाच्या माध्यमातून दिली गेली पाहिजे. कॅन्सर सारख्या आजारांना पहिल्या पायरीवर थोपवता येते अथवा त्यापासून मुक्ती मिळवता येते. परंतु यासाठी वेळोवेळी आरोग्य तपासणी केली जाणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील महिलांसाठी आपण वेळ देणार असून एक सामाजिक बांधिलकी म्हणून आपल्या शिक्षणाचा सदुपयोग करणार आहे.

उपस्थितांचे स्वागत रोहिणी सुतार, यास्मीन शेख, संध्या हेळकर, साधना लुणावत, अपर्णा पाथ्रुडकर, रेखा तोरमल, प्रिया सोळंकी यांनी केले. यावेळी स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू व प्रमाणपत्र देण्यात आले. रिया सुतार हिने सुत्रसंचालन केले तर कृष्णाई मोटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे
● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा
● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर
● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# नगरपरिषद हद्दीतील व देवस्थानच्या विकासकामासाठी १८ कोटी मंजूर



करमाळा(सं.प्र.) : करमाळा व कुर्डूवाडी नगरपरिषद हद्दीतील विविध विकासकामांसाठी नगरविकास खात्याकडून १५ कोटी तर पर्यटन व सांस्कृतिक खात्याकडून करमाळा तालुक्यातील संगोबा, शेटफळ, चिखलठाण येथील देवस्थान परिसर विकासकामासाठी ३ कोटीचा निधी मंजूर झाला आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

या निधीतून करमाळा नगरपालिका हद्दीतील महात्मा फुले चौक पुतळा ते जि.प.विश्रामगृह रस्ता मजबुतीकरण व स्ट्रीट लाईट बसविणे (१.५० लाख), दत्त मंदिर विकासनगर ते नवीन न्यायालयीन इमारत रस्ता व मेनरोड शहरांतर्गत रस्त्यांवर स्ट्रीट लाईट बसविणे (४० लाख), ICICI बँक ते जुनी लाकडी मिल फंडगल्ली (जुना बायपास) रस्ता मजबुतीकरण करणे (१.५० लाख) तसेच पालिका हद्दीत अभ्यासिका बांधणे (५० लाख), कत्तलखाना रोड (जुना नगर रोड) बेग फकीर दफनभूमी वॉल कंपाउंड बांधणे (३० लाख), माजी सैनिक कारगिल भवन कंपाउंड वॉल बांधणे व सुशोभिकरण करणे (३० लाख), राज्यमार्ग ६८ ते आण्णासाहेब हायस्कुल रस्ता मजबुतीकरण करणे (१ कोटी) दुधे डायग्नोस्टिक सेंटर ते आण्णासाहेब हायस्कुल रस्ता मजबुतीकरण करणे (५० लाख) अशी विकासकामे होणार आहेत.

कुर्डूवाडी पालिका हद्दीतील टेंभूर्णी रोडवरील बेंद ओढ्यावर पुल बांधणे, करमाळा रोड येथे संजयमामा शिंदे विद्यालय ते ब्रीच कॉर्नर पर्यंत कॅनॉल गटार बांधणे, पाणीपुरवठा केंद्र येथे सौरऊर्जा पॅनल बसविणे, कुर्डूवाडी शहरात आवश्यक त्या ठिकाणी स्ट्रीट लाईट बसविणे, राजमाता अहिल्यादेवी होळकर पुतळा परिसर सुशोभिकरण, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुतळा परिसर सुशोभिकरण पालिका हद्दीत आवश्यक त्या ठिकाणी कॉंक्रीट रस्ते, व्यापारी गाळ्याचे नूतनीकरण करणे अशी कामे होणार आहेत.

आमचे बंधू
ॲड.जगदीश सुरेश फलके
यांची भारत सरकार नोटरी पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक
सचिन सुरेश फलके, गणेश शिवदास फलके
समस्त फलके परिवार, करमाळा

JK Design Studio
आर्किटेक्ट इंजिनियर्स इंटेरियर
● आर्किटेक्चर ड्रॉईंग ॲन्ड डिझाईन (वास्तुशास्त्रनूसार)
● रेसिडेंशियल, कमर्शियल, इंडस्ट्रियल
● स्टील डिझाईन ● बिल्डिंग परवाना
● इंटेरियर डिझाईन ● बिल्डिंग कन्स्ट्रक्शन
● लॅन्डस्केप डिझाईन ● कन्सल्टन्सी


Er.Irshad M. Kazi (B.E.Civil) Mo.8421124858
Ar.Junaid M. Kazi (B.Arch) Mo.9975579996
पत्ता २६१०/३३९ गणेशनगर, करमाळा.
jkdesignstudio23@gmail.com
Jk_design_studio23

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.


प्रवेश...
श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित
प्रवेश..
ज्ञानम् परम् बलम्
नवभारत इंग्लिश मेडियम स्कूल & ट्विंक्लिंग स्टार्स
पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर
मोफत.. मोफत.. ॲडमिशन !
Nursery, L.K.G., U.K.G. 1st to 10th
वर्गासाठी प्रवेश देणे चालू
एल.के.जी. आणि यु.के.जी ची फी भरून
नर्सरीची फी माफ होणार
ऑफर : दि.१/५/२०२४ पर्यंत
टीप : नवभारत इंग्लीश स्कुल आणि वेताळपेठ या दोन्हीकडे नर्सरी ते दहावीचे प्रवेश सुरु !
प्रशालेची वैशिष्ट्ये...
पहिली ISO नामांकीत School
RO Water Machine असणारी School
शहरातील वायु प्रदुषण, ध्वनी प्रदुषण इ. पासून मुक्त वातावरण
स्वत:ची प्रशस्त इमारत
प्रशस्त Play Ground
शिशु वर्गासाठी सुसज्ज खेळणीगृह प्रशस्त क्रिडांगण
तज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद
उत्कृष्ट मार्गदर्शन व वैयक्तीक लक्ष
10th Exam साठी करमाळा Center
विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज Computer, Science Lab, Library
प्रशालेमध्ये रोजच्या रोज आरोग्यवर्धक स्वच्छता
मुलांसाठी खेळण्यास बगीचा
प्रत्येक Class मध्ये T.V. (Digital Classes)
Olympiad, MTS, Scholarship मध्ये International Level वर पोहोचलेला विद्यार्थी वर्ग
खालील QR Code ला Scan करून School पाहू शकता.
Hurry up
Admission open
NAVBHARAT ENGLISH SCHOOL
Mob No.7741907285, 9960522370


प्रशासकीय संचालक
विश्वस्त
अध्यक्ष
सहसचिव
प्राचार्य
उपप्राचार्य
विधानपरिषद सदस्य
विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक
श्री.विलासराव घुमरे (सर)
यांची श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या
प्रशासकीय संचालक पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
● यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
करमाळा., जि.सोलापूर
● यशवंत परिवार
करमाळा., जि.सोलापूर

# एलकेजी आणि युकेजीची फी भरून नर्सरीची फी माफ

## नवभारत इंग्लिश मेडियम स्कुलच्या ट्विक्लींग स्टार्सची अनोखी योजना



करमाळा (सं.प्र.): श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नर्सरी ते दहावी पर्यंत प्रवेश देणे सुरू असल्याची माहिती मुख्याध्यापिका मोहिते यांनी दिली. यावर्षी विद्यार्थ्यांच्या प्रवेश फी मध्ये आकर्षक सवलतींसह नर्सरी वर्गासाठी चक्क मोफत प्रवेशाची योजना स्कुलने राबवली आहे. स्थापनेपासून उत्कृष्ट निकालाची परंपरा असलेल्या नवभारत इंग्लीश स्कुलची प्रशस्त इमारत, क्रिडांगण, शिशुवर्गासाठी सुसज्ज खेळणीगृह, वायु प्रदुषण व ध्वनी प्रदुषण पासून मुक्त वातावरण, सुसज्ज संगणक तसेच विज्ञान लॅब, लायब्ररी, प्रत्येक क्लासमध्ये स्मार्ट टीव्ही (डीजीटल क्लास), अनुभवी व तज्ञ शिक्षकवृंद, विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष तसेच विविध स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करणारा विद्यार्थी वर्ग असल्याने दरवर्षी विद्यार्थ्यांसह पालकांचा या शाळेत प्रवेश घेण्याकडे कल असतो. यावर्षी शाळेकडून एलकेजी आणि युकेजीची फी भरून नर्सरीची फी माफ अशी सवलत उपलब्ध करण्यात आली आहे. नवभारत इंग्लीश स्कुल आणि वेताळपेठ या दोन्हीकडे नर्सरी ते दहावीचे प्रवेश सुरू आहेत. नर्सरी फी माफीची सवलत १ मे पर्यंत असल्याने पालकांनी त्वरीत या योजनेचा लाभ घ्यावा व आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा; असे आवाहन स्कुलच्या संचालिका सुनिता देवी यांनी केले आहे.


अबॅकस
हॅन्डरायटींग
वैदिक मॅथ्स
समर कॅम्प

कोणत्याही दोन सिलॅबससाठी एकत्रित ॲडमिशन केल्यास फी मध्ये विशेष सुट देण्यात येईल

१ एप्रिल २०२४ पासून नवीन बॅच सुरू

■ अबॅकस...
- ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी
- आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त अभ्यासक्रम

■ अबॅकसचे फायदे...
- बौध्दिक क्षमता, अचूकता व एकाग्रतामध्ये वाढ
- आकडेतोड गतीत वाढ ● तुमच्या दोन्ही बाजुंचा विकास
- १००० पर्यंत पाढे तयार करता येतात.

■ वैदिक मॅथ्स...
- मुलांमध्ये एकाग्रता स्मरणशक्ती लॉजिकल थिंकिंगमध्ये वाढ.
- स्कॉलरशिप ओलंपियाड स्पर्धा परीक्षांमध्ये उपयोग होतो.
- गणितांची आवड व गोडी निर्माण होते.
- रंगीत स्टडी मटेरियल
- विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी भव्य स्पर्धांचे आयोजन

■ हॅन्डरायटींग...
- मराठी इंग्रजी कर्सिव्ह ● हॅन्डरायटींगसाठी सिलॅबस उपलब्ध

संपर्क
कमलाई प्रो-ॲक्टिव्ह अबॅकस क्लासेस
'यशोदिप' मंगळवारपेठ, करमाळा. मो.9881062056, 7620705811












एस.एस.के.एस. असोसिएटस्

अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौंटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

पदासाठी अटी खालीलप्रमाणे..
- कामाची वेळ : सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- पात्रता : कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- पगार : ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)

पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.

### उजनी धरणातून होणाऱ्या
# कुगाव-शिरसोडी पुलाच्या कामास प्रशासकीय मान्यता व निविदा प्रसिध्द

करमाळा(सं.प्र.) : कुगाव-शिरसोडी पुलाच्या कामाच्या प्रशासकीय मान्यतेसह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने निविदा प्रसिध्द करण्यात आल्याने करमाळा तालुक्यात उजनी धरणाकाठच्या नागरीकांच्या आशा पल्लवीत झाल्या असून, या पुलामुळे करमाळा तालुक्याच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे.



कुगाव ते शिरसोडी दरम्यान उजनी धरणातील पाण्यातून पुल झाल्याने करमाळा तालुक्यातील पुणे, मुंबई, बारामतीकडे जाणाऱ्या लोकांच्या वाहनांच्या इंधन व वेळेमध्ये बचत होणार आहे. तसेच करमाळा तालुक्यातील निर्यातक्षम शेतमाल पिकविणारा परंतु रस्त्याच्या दृष्टीने काहीसा दुर्लक्षित असणारा हा भाग मुख्य बाजारपेठेशी जोडला जाणार आहे. **...धनश्री गलांडे** (सरपंच, चिखलठाण)

इंदापूर येथील शेतकरी मेळाव्यात इंदापूर तालुक्यातील शिसोरडी ते करमाळा तालुक्यातील कुगाव दरम्यान उजनी धरणातील पाण्यात पुल उभारण्याच्या कामाची मागणी इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांनी केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या संदर्भात ही मागणी मान्य केली जाईल; असे सांगितले होते. यानुसार प्रशासकीय मान्यता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने देण्यात आली असून या संबंधीच्या निविदा वृत्तपत्रातून प्रसिध्द करण्यात येणार आहे. उजनी धरणातून पुल होत असल्याने करमाळा तालुक्यातील नागरीकात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देशानंतर शिरसोडी व कुगाव यांना जोडणाऱ्या उजनी धरण बँकवॉटर मध्ये लांब पुलाचे बांधकाम करण्यासाठी ३९५ कोटी ९७ लक्ष ३२ हजार अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. **...तेजस्विनी कोकरे** (माजी सरपंच, कुगाव)

महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त स्वयं अर्थसहाय्यित शाळा
श्री बालाजी बहुउद्देशीय संस्था, चिखलठाण संचलित
न्यू. इरा पब्लिक स्कुल अँन्ड ज्युनिअर कॉलेज, चिखलठाण
ता.करमाळा, जि.सोलापूर

**शिक्षक पाहिजेत**

करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नांवलौकीक मिळवलेल्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी इंग्रजी, सेमी इंग्रजी माध्यमाच्या व ज्युनिअर कॉलेज मध्ये खालील पदे त्वरीत भरणे आहेत.

| क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | विषय | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक | H.S.C. D.T.Ed | सर्व विषय (इंग्रजी माध्यम) | ३ |
| २ | सहशिक्षक | H.S.C. D.T.Ed | सर्व विषय (मराठी माध्यम) | ३ |
| ३ | सहशिक्षक | B.A./M.A. B.Ed | इंग्रजी | १ |
| ४ | सहशिक्षक | B.A./M.A. B.Ed | हिंदी | १ |
| ५ | सहशिक्षक | B.Sc/M.Sc B.Ed | Chemistry | १ |
| ६ | सहशिक्षक | M.Sc.B.Ed | Physics | १ |
| ७ | सहशिक्षक | M.Sc.B.Ed | Maths | १ |
| ८ | सहशिक्षक | M.Sc.B.Ed | Biology | १ |
| ९ | स्पर्धा परीक्षा तज्ञ (नवोदय/स्कॉलरशीप) | B.A./B.Sc/B.Com | सर्व विषय | १ |
| १० | क्लार्क (महिला) | B.A./B.Com/B.Sc (Typing Tally) | --- | १ |
| ११ | क्रिडा शिक्षक | B.P.Ed | --- | १ |

- पात्र उमेदवारांनी सोमवार दि.१/४/२०२४ रोजी प्रशालेच्या कार्यालयात अर्ज व आवश्यक कागदपत्रासह स्वखर्चाने सकाळी १० ते १ या वेळेत वरील पत्त्यावर उपस्थित रहावे.
- टीप : अनुभवी उमेदवारास प्राधान्य राहील.

संपर्क : मो.९८५०७८०७८९, ९७६३६४४४०३, ७७४४०४२२९४

# ग्राफिक्स डिझायनर पाहिजे

संपर्क : गुरूदेव ग्राफिक्स
मो.9881650767, 9665565594

### भारतीय आयुर्विमा महामंडळाचे
# विकास अधिकारी अनिरूध्द बिडवे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : महेंद्रनगर येथील रहिवाशी व भारतीय आयुर्विमा महामंडळाचे विकास अधिकारी अनिरूध्द प्रभाकर बिडवे यांचे १९ मार्चला सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने राहत्या घरी निधन झाले आहे.

अनिरूध्द बिडवे हे अत्यंत शिस्तप्रिय, निर्भिड व्यक्तीमत्व होते. तसेच एलआयसी म्हणजे बिडवे साहेब अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. त्यांची पंढरपूरच्या पांडुरंगावर अफाट श्रध्दा होती. त्यांना इतिहासाचे संशोधक, साहित्यिक म्हणूनही ओळखले जात होते. बिडवे यांनी आपल्या लेखणीतून 'बखर राजेरंभाजी', 'ऐका महाराष्ट्र', 'विमा शास्त्र', 'सोलापूर मार्शल लॉ १९३०' ही चार पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यातील विमा शास्त्र हे पुस्तक औरंगाबाद युनिर्व्हसिटीला अभ्यासक्रमासाठी देण्यात आलेले आहे. अतिशय सहकार्याच्या भावनेतून विमा क्षेत्रातील कोणत्याही कसल्याही प्रकारच्या अडचणी असल्यातरी त्या व्यवस्थित शांतपणे समजावून घेऊन त्याचे काम तत्परतेने पूर्ण करणे हा बिडवे यांचा स्वभावच होता.

विमा क्षेत्रातील सेवा कालावधीत त्यांनी अनेक जणांचे क्लेम त्वरीत मिळवून दिले आहेत. डेथ क्लेमच्या प्रकारात ग्राहकांची बाजू भक्कमपणे मांडणे, त्याला आधार देणे, ग्राहकास जास्तीत जास्त हेलपाटे न लावता लवकरात लवकर क्लेम मिळवून देणे हा त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या जाण्याने एलआयसी परिवरात व साहित्य क्षेत्रात खूप मोठी पोकळी निर्माण झाल्याची प्रतिक्रीया व्यक्त केली जात आहे. अनिरूध्द बिडवे यांचे मागे एक भाऊ, तीन बहिणी, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे. प्राचार्य कै.प्रभाकर बिडवे यांचे ते सुपुत्र होते. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

# उपमहाराष्ट्र केसरी अतुल पाटील यांना 'मल्हाररत्न' पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.): होळकरशाहीचे संस्थापक श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या ३३ व्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक फाऊंडेशनच्या वतीने पंडित नेहरू सांस्कृतिक सभागृह, पुणे येथे 'मल्हाररत्न' पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. यावेळी जेऊर येथील डबल उपमहाराष्ट्र केसरी व पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील यांना मल्हाररत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर, ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस, पुणे आयकर आयुक्त नितीन वाघमोडे, कार्यक्रमाचे संयोजक धनंजय तानले यांचे हस्ते अतुल पाटील यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर महिला बालकल्याणचे उपायुक्त दिलीप हिवराळे, जिल्हा क्रिडा अधिकारी सुहास व्हनमाने, उद्योजक अनिल राऊत, विवेक बिडगर, हिंदकेसरी अभिजीत कटके, लक्ष्मण नजण, उद्योजक रोहिदास गोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

तोच विश्वास, तीच सेवा
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
**आनंद ड्रायफ्रुटस्**

• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रवाळयुक्त गुलकंद, पापड आटा पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ,मेथी,लोणचे मसाले...
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट

एकवेळ अवश्य भेट द्या..!
करमाळा अर्बन बँकेशेजारी, मेनरोड, करमाळा.

# जेऊर येथील आरोग्य केंद्र वाशिंबे येथे स्थलांतरीत करण्यास मंजुरी

करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वाशिंबे येथे स्थलांतरीत करण्यास जिल्हा नियोजन समितीमध्ये मंजुरी मिळाली आहे; अशी माहिती मकाईचे संचालक गणेश झोळ यांनी दिली.

याबाबत बोलताना श्री.झोळ म्हणाले, की जेऊर येथे ग्रामीण रूग्णालय झाले असल्यामुळे तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र वाशिंबे येथे स्थलांतरीत करण्याबाबत भाजपा प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्या माध्यमातून आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचेकडे मागणी होती. प्रा.सावंत यांनी सकारात्मक दखल घेत आरोग्य विभागास स्थलांतरण करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आरोग्य विभागाने सर्व बाबींची तपासणी करून जेऊर प्राथमिक आरोग्य केंद्र वाशिंबे येथे स्थलांतरीत करण्यासाठी जिल्हा परिषद, जिल्हा आरोग्य समिती, जिल्हा नियोजन समिती यांचेकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार तीनही समित्यांकडून यास मंजुरी मिळाली असून वरीष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यामुळे वाशिंबे येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामासाठी व कर्मचारी वसाहतीसाठी सहा कोटीहून अधिक निधी शासनाकडून मिळणार आहे. या स्थलांतरणासाठी सरपंच तानाजी झोळ यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने लागणारे सर्व ठराव देऊन तसेच आमदार संजयमामा शिंदे यांचे शिफारस पत्र देऊन सहकार्य केले आहे; असेही गणेश झोळ यांनी सांगितले.

वाशिंबे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरणास मंजुरी मिळाल्यामुळे या परिसरातील रूग्णांवर तज्ञ डॉक्टरांकडून विनाशुल्क उपचार केले जाणार आहेत. त्यामुळे वाशिंबे ग्रामस्थांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

> वाशिंबे आरोग्य केंद्रात डॉक्टर, नर्सेस, कंपाउंडर तसेच इतर सेवक वर्ग असून या अंतर्गत चिखलठाण, केडगाव, कोंढेज, शेटफळ, वाशिंबे या उपकेंद्राचा समावेश आहे. वेगवेगळ्या साथीच्या रोगांचा प्रतिबंध, आरोग्याचा प्रसार आणि आजारांवरचे उपचार करणे हे प्राथमिक आरोग्य केंद्राचे मुख्य कार्य आहे.

## मुक्या प्राणी व पक्षांसाठी..

# कै.बाबुराव गायकवाड प्रतिष्ठान मार्फत २७ हजार लिटर पाण्याची सोय



करमाळा(सं.प्र.) : मुक्या प्राण्यांना व पक्षांना पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवू लागल्याने येथील कै.बाबुराव तात्या गायकवाड प्रतिष्ठानचे सचिन गायकवाड यांनी आज वनविभागातील तलावात २७ हजार लिटर पाणी टँकरद्वारे पाणी सोडले आहे. यावेळी महादेव फंड, पत्रकार नासीर कबीर, दिनेश मडके, सचिन जव्हेरी, समाधान फरतडे, प्रमोद भाग्यवंत, कुकडे सर, दादा इंदलकर, श्री.बिडवे आदी मान्यवर उपस्थित होते.

> कै.बाबुराव तात्या गायकवाड प्रतिष्ठान मार्फत नेहमीच समाजपयोगी उपक्रम राबविले जातात. माणुसकीची भिंत, रूग्णांना मदत, पशुपक्षांना पाणी व खाद्य, उत्सवामध्ये गरीब लोकांना शिधावाटप, शैक्षणिक साहित्य वाटप अशाप्रकारे सातत्याने समाजासाठी कार्यरत असणाऱ्या या प्रतिष्ठानचा आदर्श इतरांसाठी अनुकरणीय ठरलेला आहे.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# आदिनाथ कारखान्यास गतवैभव प्राप्त करून देणार : विलासराव घुमरे



करमाळा(सं.प्र.) : श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या प्रशासकीय संचालक पदी विलासराव घुमरे यांची नियुक्ती झाल्याबद्दल यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व यशवंत परिवार तसेच बी.कॉम भाग-३ च्या विद्यार्थीनींच्या वतीने घुमरे सरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.एल.बी. पाटील, संस्थेचे अध्यक्ष मिलींद फंड, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक आदी मान्यवरांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सत्काराला उत्तर देताना विलासराव घुमरे यांनी माझ्या प्रशासकीय कामकाजामध्ये आदिनाथ कारखान्याला गतवैभव प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी प्रा.लक्ष्मण राख, प्रा.हनुमंत भोंग, प्रा.अभिमन्यु माने, प्राचार्य डॉ.पाटील, मिलींद फंड यांनी मनोगत व्यक्त केले व पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचालन प्रा.प्रदीप मोहिते यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.मुन्नेश जाधव यांनी मानले.

# सरपडोह येथे कृषी सहाय्यक पदी निवड झालेल्या युवकाचा नागरी सत्कार



करमाळा(सं.प्र.) : सरपडोह येथील युवक शिवाजी पांडूरंग वाळके यांची महाराष्ट्र शासनच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेतून कृषी सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला.

शिवाजी वाळके हे पांडूरंग आजिनाथ वाळके व सरपंच मालन वाळके यांचे सुपुत्र आहेत. अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन शिवाजी वाळके यांनी हे यश संपादन केले आहे. गावातील युवक कोणत्याही स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी झाल्यावर सरपडोह ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्याची परंपरा आहे. त्यातील एक भाग म्हणून शिवाजी वाळके यांचा सत्कार सरपडोह गावचे सुपुत्र व पोलीस उपनिरीक्षक प्रदीप भिताडे व महाराष्ट्र पोलीस प्रदीप भंडारे यांचे हस्ते करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना श्री.वाळके यांनी सातत्य व मनामध्ये जिद्द असेलतर आपण यशस्वी होऊ शकतो; असे सांगितले. यावेळी सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, पोलीस पाटील, आजी-माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन उपसरपंच नाथराव रंदवे यांनी केले.

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
श्रीजी इस्टेट एजन्सी
• घरजागा, दुकान जागा
• प्लॉट व बंगले
• जमीन बिनशेती करणे
• व्यवहार करून दिले जातील
• सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.
पत्ता : मेनरोड, करमाळा.

# माणुस...



सध्या सगळीकडेच माणसांची गर्दी खूप वाढली आहे. शहरात, गावात, बाजारात आणि मंदिरात सुध्दा माणूस वाढतोय. सगळीकडे असा माणूस वाढत असताना सुध्दा माणुस खूप एकटा आहे. त्याच्या जीवाभावाची माणसे कमी होत चालली आहेत. प्रेमाचा, मायेचा संवाद कमी होत चाललाय. माणसातील माणुसपण संपत चाललंय. माणसातला माणूस मरत चाललाय.

शहरे खूप विस्तारली, सुंदर झाली पण तरीही सांजवेळी शहरातील घरांच्या बंद दारावर चिमण्यांचा उच्छाद नसतो.., ओसरीच नसते. त्यामुळे ओसरीतील शांतता, समाधान आता मनाच्या तळापर्यंत झिरपत नाही. मी माझ्या बालपणी गावाकडे खूप शांत-सुंदर रात्री पाहिल्या. स्तब्ध नि:शब्द गावावर चंद्राचा दुधीया प्रकाश पडलेला असायचा. कुठेतरी छपरात कुणाचा तरी भाकऱ्या बडवण्याचा आवाज यायचा. मधूनच कुत्र्याला फेकून मारलेल्या काठीचा खडखडाट व्हायचा आणि नंतर शिव्यांचा भडीमार. त्यानंतर सारे कसे शांत होऊन जायचे. मग रात्र वाढत जायची.सतत वाजणाऱ्या भैरवनाथाच्या मंदिरातील घंटेचा आवाज हळूहळू बंद होऊन जाई. मंदिराच्या समोरच्या वडाच्या झाडावर अस्वस्थ कावकाव करणाऱ्या कावळ्यांना आता शांत झोप लागलेली असे. अशा या वातावरणातून दादाबुवांच्या घरातून पेटीचे मधूर सुर दरवळत. त्या पाठोपाठ त्यांच्या सुरेल गळ्यातून "वारीयाने कुंडल हाले, डोळे मोडीत राधा चाले.." या गौळणीचे सूर बाहेर पडत. त्या पाठोपाठ तबल्यावरची मोहक थाप वातावरणाला बेधूंद करून जाई.

अंगाभोवती चादरी गुंडाळून भजनकरी त्यांच्या घराकडे कंदील घेऊन लगबगीने जाताना दिसत. मग ती रात्र-रात्रच रहात नसे, रात्रीचे मदहोश तारूण्य अंगावर पांघरूण आपण त्या भजनात हरवून जायचे.. बस्सऽऽ!

आज या साऱ्याच गोष्टी हरवल्यात. भजने संपली, पारावरच्या गप्पा बंद झाल्या. सुताराच्या मेटावरची सुख-दु:खाची चौकशी कालबाह्य झाली. रात्रीच्या अविस्मरणीय भजनात जी जीवन जगण्याची ऊर्जा होती ती संपली. त्या भजनातून जगण्यातील संकटांशी लढण्याची जी ताकद मिळायची ती बंद झाली. तिथे एकमेकांशी संवाद साधून, ईश्वराचे नामस्मरण करून टेन्शन, काळज्या, चिंता दूर व्हायच्या. एका नव्या उमेदीने नवीन दिवसाची नवी सुरूवात होई ती नष्ट झाली आणि माणूस एकला उरला ! मग आत्महत्या..., मरण... अणि झुरणे.. म्हणूनच म्हणावेसे वाटते...

**माणसांनो भानावर या रे**
**चढाओढ फार झाली**
**एकतरी माणूस पेरून ठेवा**
**माणूसतोड फार झाली...**

म्हणूनच पुन्हा संवाद सुरू व्हावेत. रात्री भजनाचे सूर पुन्हा हवेत दरवळावेत जबरदस्त आशावादावर जीवनाची इमारत उभी राहायला हवी म्हणून मी म्हणतो..

**हरवता माणसे ही गर्दीत माणसांच्या**
**माझा मीच मजला आता शोधणार नाही**
**शहरे उजाड झाली माणूस पांगलेला**
**देऊन घाव त्यांना मी पळणार नाही**
**मीच केले माझ्या दु:खावरी हे हल्ले**
**दारात देवळांच्या मी लोळणार नाही**
**सूर्य बुडाला जरासा क्षितिजावरी कधीचा**
**अंधार हा दिव्यांचा मी पाळणार नाही**
**हे रक्त चांदण्याचे ओघळून रात गेली**
**मी आता कुणाला पुन्हा छळणार नाही**

**...भीष्माचार्य चांदणे**
**(मो.9881174988)**

# बाळेवाडीतून बनले तब्बल तीन अधिकारी

## ग्रामस्थांकडून गुणवंतांसह त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार

करमाळा(सं.प्र.): महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नुकत्याच जाहीर केलेल्या निकालात बाळेवाडी येथील तीन गुणवंतांनी घवघवीत यश संपादन केले आहे. बाळेवाडीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवलेल्या या तीनही गुणवंतांसह त्यांच्या यशात सिंहाचा वाटा असलेल्या पालकांचा ग्रामस्थांनी यथोचित सन्मान केला आहे.

बाळेवाडी येथील राम विलास नलवडे यांची विक्रीकर निरीक्षक (एसटीआय) पदी, अविनाश रमेश नलवडे यांची तलाठी (नाशिक) पदी आणि निलेश सुभाष नलवडे यांची तलाठी (सोलापूर) पदी नियुक्ती झाली आहे. या तिघांनी संपादन केलेल्या यशाबद्दल ग्रामस्थांनी या तिघांची ढोलताशाच्या गजरात मिरवणूक काढून त्यांच्यासह त्यांच्या आई-



वडिलांचा सुध्दा सत्कार केला आहे. बाळेवाडी येथील तीन तरूणांनी गावातील तरूणपिढी समोर एक चांगला आदर्श निर्माण केल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मधुमेह

भाग-१




गेल्या काही वर्षात एक विदारक परिस्थिती जाणवली. मधुमेह किंवा उच्च रक्तदाबाचे प्रमाण खूपच जास्त वाढत आहे. तरूणांमध्ये याचे प्रमाण वाढत असून भारत मधुमेहाचे रूग्णात अव्वलस्थानी आहे. ज्यांचे घरात याचे रूग्ण आहेत त्यांचे मुलांना, अनुवंशिकतेने मधुमेह, उच्च रक्तदाब होण्याची शक्यता जास्त असते. काही दशकापूर्वी ग्रामीण भागात याचे प्रमाण कमी होते, आता वाढत आहे.

मधुमेह आणि उच्च रक्तदाब हे सुक्ष्म आणि स्थुल पध्दतीने शरीरावर आघात करणारे व्याधी. हे टाळण्यासाठी काही करता येईल का ? हो नक्कीच..!

मधुमेह आणि उच्च रक्तदाब म्हणजे काय ?, हे आजार का होतात ?, या आजारांचे दुष्परिणाम काय ?, या आजारावर उपचाय काय ?, हे आजार टाळता येतील का ?, जीवनशैली कशी असावी ? हे समजून घेवूया !

मधु म्हणजे मध, गोड. प्राचीन काळी लघवी भोवती मुंग्या जमा होताना पाहताना, या व्याधीचे नाव मधुमेह. वाढलेली रक्त शर्करा. रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्याची कामगिरी स्वादुपिंडातून तयार होणारे इन्शुलीन करीत असते. या इन्शुलीनचा अभाव, कमतरता किंवा वापरात बिघाड किंवा दोन्ही हे मधुमेह होण्यासाठी कारणीभूत. यामुळे कार्बोदके, स्निग्ध पदार्थ, प्रथिने यांचे शरीरातील वापरात असंतुलन किंवा बिघाड निर्माण होतात. मधुमेहातील दीर्घकाळ वाढलेली रक्त शर्करा सुक्ष्म आणि ठळकपणे अवयवांसाठी अपायकारक ठरते. यात अनेक अवयवावर आघात होतो, यामुळे उपयुक्तता बदलते. अवयव खराब होतात किंवा कार्यप्रणालीमध्ये कमकुवतपणा येतो. उदा.. डोळे, मुत्रपिंडे, हृदय आणि रक्तवाहिन्या, मज्जासंस्था, डोळे-रेटीनोपॅथी आणि अंधत्व. हृदय रक्तदाब वाढविते. रक्तवाहिनी काठीण्य, ब्लॉकेजेस. मज्जासंस्था -ऑटोनोमिक आणि पेरिफेरलवर आघात यामुळे बधीरता, मुंग्या येणे इ. या दीर्घकालीन आजारचे प्रमाण वाढत आहे. याचे कारण.. वाढती सुबत्ता, वाढते शहरीकरण, आधुनिक चंगळवादी जीवनशैली, व्यायामाचा अभाव. हा कडू गोडवा का होतो आणि कसा ओळखावा.. हे पुढील भागात. (क्रमश:..)

**...डॉ.सुभाष सुराणा, जेऊर.**


# गुरूकुल पब्लिक स्कुल

श्रीदेवीचामाळ, ता.करमाळा, जि.सोलापूर

## शिक्षक पाहिजेत

आमचे येथे सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षामध्ये खालील पदे भरणे आहेत.

| क्र. | विषयाचे नाव | पदांची संख्या | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक | B.A.D.ed, M.A.D.ed(किमान १ वर्ष अनुभव) | ५ |
| २ | विज्ञान व गणित | B.Sc.B.ed, M.Sc.B.ed(२ ते ५ वर्ष अनुभव) | ४ |
| ३ | चित्रकला | B.A., A.T.D. (किमान १ वर्ष अनुभव) | १ |
| ४ | मराठी, हिंदी | B.A.B.ed, M.A.B.ed(किमान २ वर्ष अनुभव) | २ |
| ५ | क्रिडा शिक्षक | B.P.ed (किमान २ वर्ष अनुभव) | २ |
| ६ | लिपीक | B.A., B.Sc (टायपिंग कॉम्प्युटर मराठी/इंग्रजी) | २ |
| ७ | ड्रायव्हर | १० वी, १२ वी, बी.ए.पास (किमान २ वर्ष अनुभव) | ३ |
| ८ | शिपाई | १० वी, १२ वी पास(पुरूष व महिला) | ३ |
| ९ | वॉचमन | १० वी पास | २ |

इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी शनिवार दि.३०/३/२०२४ रोजी सकाळी ९ ते १ या वेळेत अर्ज, मुळप्रमाणपत्र, झेरॉक्स प्रतिसह गुरूकुल पब्लिक स्कुल मध्ये उपस्थित रहावे.

**मुख्याध्यापक**
**गुरूकुल पब्लिक स्कुल, श्रीदेवीचामाळ, ता.करमाळा.**



**प्लॉट विकणे आहे**

**बायपास रोड जवळील १८३६ स्के.फुट एन.ए. प्लॉट विकणे आहे संपर्क:मो.9423237685**

न्यु प्रविण सुपर मार्केट

- नं.१ २१८९ गहू - ३५ रू. किलो
- बाजरी नं.१ - ३२ रू. किलो
- ज्वारी भारी - ५० रू. किलो

आरोग्यासाठी आवश्यक गावरान कडधान्य भाव...

- मटकी गावरान बारीक - १०५ रू. किलो
- मटकी मोठी - ८५ रू. किलो
- चवळी - १०० रू. किलो
- मसुर बेस्ट - ८० रू. किलो
- वटाणा - ९० रू. किलो
- बारीक गावरान मुग - १२० रू. किलो
- पाणीपुरी वटाणा - ८० रू. किलो
- काबोली हरभरा - १०० रू. किलो
- गावरान हरभरा - ६५ रू. किलो
- मटकीदाळ - ११० रू.किलो
- मुगदाळ - १२० रू. किलो
- मसुरदाळ - ९० रू.किलो
- बेस्ट उडीददाळ - १३० रू. किलो.

ड्रायफ्रुट...

- नं.१ बदाम -६०० रू. किलो
- काजु - १६० रू. पावकिलो
- अंजीर - २५० रू. पावकिलो
- पिस्ता - २५० रू. पावकिलो
- काळा मणुका - ९० रू. पावकिलो
- मणुका भारी - ६० रू. पावकिलो
- खजुर बॉक्स - १५० किलो
- पॅकींग खजुर - ७५ रू. अर्धा किलो
- भारी खजुर - १४० रू. किलो
- महावीर पापड - ११० रू. पॅकींग
- जोड गहू - ७० रू. किलो
- खोबरं - १३० रू. किलो
- गावरान धने - १०० रू. किलो
- पॉपकॉर्न मका - ३५ रू. पावकिलो
- पाणीपुरी - २५ रू. पावकिलो
- पाणीपुरी वटाणा - २० रू. पावकिलो
- गावरान बारीक मोहरी - ९० रू.किलो
- आरोग्यासाठी नाचणी - ७० रू. किलो
- खारीक नं.१ : २४० रू. किलो

चिंच घेतली जाईल
फोडलेली : ७५ रू.किलो
आखखी : २१ रू.किलो
चिचुका : १८ रू.किलो

ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
संपर्क मो.9168052318

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संजीवनी पात्र लोकार्पण सोहळा संपन्न



करमाळा(सं.प्र.): राष्ट्रीय सेवा योजना स्तर दोन व बुध्दभूषण फाउंडेशन पुणे यांचे संयुक्त विद्यमाने जागतिक चिमणी दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संजीवनी पात्र लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, बुध्दभूषण फाऊंडेशनचे उपाध्यक्ष दुर्गेश राठोड, राजेश पाटील, राहुल बागल, दादा देवकर, प्रा.हरिदास बोडके, प्रा.पल्लवी टोणपे, प्रा.स्वाती मोरे, प्रा.अश्विनी अडसुळ, प्रा.जयंत भांगे व एनएसएसचे स्वयंसेवक उपस्थित होते. याप्रसंगी एनएसएसच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील सर्व झाडांवर संजीवनी पात्र बांधून हजारो पक्षांच्या चाऱ्याची व पाण्याची सोय केली. जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून पक्षांबद्दल आपुलकी, प्रेम व जिव्हाळा निर्माण व्हावा या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी संजीवनी पात्राचे सहकार्य सुशील राठोड, संदीप चुंग यांनी केले. तसेच या स्तुत्य उपक्रमासाठी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे व शरद कोकीळ यांच्या श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने १० संजीवनी पात्र देण्याचे जाहीर केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनएसएस च्या टीमने विशेष परिश्रम घेतले.

## हाजी हाशमोद्दीन तांबोळी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे रोजा ईफ्तार पार्टी



करमाळा(सं.प्र.) : हाजी हाशमोद्दीन तांबोळी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व करमाळा मुस्लिम समाजाचे अध्यक्ष हाजी उस्मानशेठ तांबोळी व माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी यांनी रमजान ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या ईफ्तार पार्टीत मुस्लिम समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. यावेळी पोलीस निरीक्षक विनोद घुगे, लोकसभेचे इच्छुक उमेदवार अभयसिंह जगताप, सावंत गटाचे नेते सुनील सावंत, माजी नगरसेवक संजय सावंत, राष्ट्रवादीचे संतोष वारे, शिवसेना शहरप्रमुख (ठाकरे गट) प्रविण कटारिया, माजी नगराध्यक्ष शौकत नालबंद, संजय शिंदे, माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, फारूक जमादार, विनय ननवरे, दादासाहेब इंदलकर, राजेंद्र घाडगे, कंदरचे सरपंच मौला मुलाणी, केमचे उपसरपंच सुलतान शेख, अमोल यादव, सचिन घोलप, विजय लावंड, बाळासाहेब इंदुरे, रणजित ढाणे, अशपाक जमादार यांचेसह मुस्लिम समाजबांधव उपस्थित होते. सर्वप्रथम सायंकाळी पावणेसात वाजता मौलाना मोहसीन, मौलाना सिकंदर यांनी प्रार्थना केल्यानंतर उपवास सोडण्यात आला. यावेळी ट्रस्टच्या वतीने फळे, खजूर, शरबतची व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक घुगे म्हणाले, की मुस्लिम बांधवांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण व पवित्र समजला जाणारा रमजान महिना सुरू असून या महिन्यात मुस्लिम बांधव एक महिन्याचा उपवास करतात. खऱ्या अर्थाने आपल्या वाईट सवयी नष्ट करण्यासाठी हा पवित्र महिना आहे. दैनंदिन जीवनात धावपळ करून माणूस अध्यात्मापासून दूर जातो. परंतु रमजान महिन्यात त्याला एक उत्तम संधी मिळते आणि या संधीचा फायदा घेऊन परमार्थ साधण्याचा प्रयत्न करावा; असे सांगितले. प्रास्ताविक राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अमीरशेठ तांबोळी यांनी केले. या कार्यक्रमासाठी हाजी अतिक बेग, वाजिद शेख, तौफिक शेख, मुख्तार पठाण, इंताज वस्ताद, अशपाक सय्यद, अलिम शेख, अफरोज पठाण, मोहसीन पठाण यांनी परिश्रम घेतले.

## सहाय्यक प्रकल्प अधिकारी महेश कवडे यांची निवड



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा २०२२ परीक्षेतून सहाय्यक प्रकल्प अधिकारी (राजपत्रित) पदी कविटगाव येथील महेश जोतीराम कवडे यांची निवडझाली आहे. या परीक्षेची पूर्व व मुख्य परीक्षा २०२३ मध्ये तर मुलाखत जानेवारी २०२४ मध्ये घेण्यात आली होती. यापूर्वी महेश कवडे यांची पुणे जिल्ह्यात तलाठी व जीएसटी विभागात राज्यकर निरीक्षक पदावर निवड झालेली आहे. सध्या जीएसटी विभागात माझगाव, मुंबई येथे राज्यकर निरीक्षक पदावर ऑगस्ट २०२३ पासून कार्यरत आहेत. त्यांची सहाय्यक प्रकल्प अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे करमाळा तालुक्यातून विशेषत: कविटगाव ग्रामस्थांकडून अभिनंदन होत आहे.

डिजीटल युगात ताठ मानेनं जगायला शिकवणारा
शासनमान्य कोर्स
MS-CIT
प्रवेश देणे सुरू
परीक्षा मे २०२४
MS Office 2019, Windows 10
Internet, Online Working
मर्यादित प्रवेश, त्वरीत प्रवेश घ्या !
प्रवेश मुदत दि.२५ मार्च
ई टेंडर निविदा
नगरपालिका, जिल्हापरिषद, ग्रामपंचायत
सर्व प्रकारचे शासकीय निविदा भरण्याची सुविधा
संपर्क वर्ल्ड कॉम्प्युटर सेंटर, अभंग हॉस्पिटल जवळ, शिवाजीनगर, वाय.सी.एम.कॉलेज रोड, करमाळा. मो.9423526382

ॲड.प्रियाल ल. अग्रवाल
ऑफिस नं.१०, दिवाणी न्यायालय समोर
विद्यानगर, करमाळा., जि.सोलापूर
मो.९७६६३३६६७७

## सावधानतेची नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील क.गट नं.२२७/१ पैकी, क्षेत्र - ०० हे. ९४ आर, आकार - ०० रू. १५ पैसे तसेच डि.सोलापूर, ता.करमाळा पैकी मौजे जेऊरवाडी हद्दीतील शेतजमीन मिळकत क.ग.नं.१५०/२ पैकी क्षेत्र - ०१ हे. ७५ आर, आकार - ०२ रू. ८४ पैसे. या मिळकती मध्ये आमचे अशिल नामे सौ.नंदा सुरेश लोंढे यांचा हक्क, अधिकार व हितसंबंध असून तसा आमचे अशिलांचा सदर मिळकतीबाबत करार देखील झालेला होता व आहे. सदर मिळकतीबाबत तिऱ्हाईत इसमांनी हेतुपुरस्कर हस्तांतरीत व्यवहार करून पुढे त्या अकृषिक करून त्याचे प्लॉट्स तयार करून ते विक्री करण्याचे प्रयत्नात असलेबाबत आमचे अशिलांना खात्रीलायक माहिती असल्याने आमचे अशिलांनी सदर मिळकतीबाबत मे.करमाळा येथील सि.ज.सि.डि.सो यांचे कोर्टात स्पे.मु.नं.८७०/२०२३ अन्वये साठेखतावरून ताब्यासह खरेदीखत करून मिळणेसाठी आणि जाहीर ठरावासाठी दावा दाखल केलेला असून तो अद्यापपावेतो प्रलंबित आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर मिळकतीमध्ये वर नमूद दाव्यातील प्रतिवादींनी मिळकत ही अकृषिक करून तिचे प्लॉटींग पाडून विक्री केलेस सदर मिळकतीमधील प्लॉट्स विकत घेणारे लोकांना देखील कायदेशीर बाबींना सामोरे जावे लागेल. तसेच यदाकदाचित आमचे अशिलांना दाव्यामध्ये यश आलेस प्लॉट्स खरेदीधारकांना त्यांचा मालकी हक्क जाणार आहे व इतर स्वरूपाचे नुकसान होणार आहे. सबब गाव मौजे जेऊर व आजुबाजूचे परिसरातील लोकांची फसगत होऊ नये, सबब सदरच्या नोटीसीने तमाम लोकांस सावध करणेकरीता प्रस्तुतची सावधानतेची जाहीर नोटीस आमचे अशिलांना देणे भाग पडत आहे. सदरची नोटीस जाहीर होऊन देखील कोणी वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही प्रकारचा व्यवहार केलेस तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली. ता.२८/०२/२०२४

अशिला तर्फे ॲडव्होकेट

विकास अधिकारी, एल.आय.सी.



स्व.अनिरूध्द प्रभाकर बिडवे
(मृत्यु दि.१९/३/२०२४)

विमा प्रतिनिधींचा

# आधारवड हरपला

## भावपूर्ण श्रध्दांजली !

ना ध्यानी.., ना मनी..,
तुम्ही गेला आम्हां सोडूनि ।
केली सर्वांवर प्रेमाची बरसात..,
विमा प्रतिनिधींच्या मदतीसाठी
अग्रणी होते हात ।
सर्व स्तरातील नागरीकांना..,
विम्याचा मिळवून दिला लाभ ।
कोठून आणावी अशी दिव्यमुर्ती..,
पुर्नजन्म घ्यावा तुम्ही आमच्यासाठी।

भारतीय आयुर्विमा महामंडळाचे विकास अधिकारी व आमचे मार्गदर्शक **कै.अनिरूध्द प्रभाकर बिडवे** यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना !

**शोकाकुल** शेवंतीलाल मेहता, दिलीपभाई मेहता, निलेश गुगळे, संतोष बलदोटा, सुनिल गवळी संभाजी खताळ, सुभाष आवताडे, कृष्णा सरडे, सुरेश भोसले, दत्तात्रय मस्कर सर, भावेन मेहता

**भारतीय आयुर्विमा महामंडळ परिवार, करमाळा.**

